दिनांक : ०८.०४.२०२४

# प्रिझम फौंडेशन
## वार्षिक अहवाल २०२३ - २०२४

दि. १३.०६.२०२३ पासून तिन्ही शाळा नियमित सुरू झाल्या.

वार्षिक कार्यक्रम

| क्र. | दिनांक | सांस्कृतिक कार्यक्रम | प्रमुख पाहुणे | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | ०१.०६.२०२३ | संस्थापन दिन | प्रिझम फौंडेशन ट्रस्टी | 'स्वर आकाश - गाणी तुमची आमची' ग्रुप |
| २ | २८.०६.२०२३ | पालखी | - | विद्यार्थ्यांनी अभंग, भक्तीगीते व संताची ओळख हे नाटक सादर केले. |
| ३ | १५.०८.२०२३ | १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन | प्रिझम फौंडेशन ट्रस्टी | 'मेरी माटी - मेरा देश' अंतर्गत उपक्रम |
| ४ | ०८.०९.२०२३ | कै. पद्मजा गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा | मा. आरती भट | आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा बाहेरील शाळेतील २५ विद्यार्थी सहभागी |
| ५ | २६.०१.२०२४ | प्रजासत्ताक दिन तमोहर प्रकशन | मां. श्री. रविंद्र वंजारवाडकर | गाणे, योगासने, कवायत, लेझीम विद्यार्थ्यांचे सादरीकरण व तमोहर प्रकाशन |
| ६ | ०३.०२.२०२४ | प्रदर्शन | - | 'पुणे परिसर' |

- पर्यावरण दिन फिनिक्स शाळेतील विद्यार्थ्यांनी बागेत व जॉगिंग ट्रॅक वर पर्यावरण स्वच्छतेचे फलक हातात घेवून त्याचे महत्व लोकांना पटवून दिले. तर लार्क व एम.ओ.व्हि.एस मधील विद्यार्थ्यांना औषधी वनस्पती महत्व, वेगवेगळया फुलांची व पानांची माहिती सांगण्यात येवून वृक्षारोपण करण्यात आले.
- योगा दिन - तिन्ही शाळेत विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे योगासने करून घेण्यात आली. शिक्षकांनी योगासनाचे प्रात्यक्षिक सादर केली.
- १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त 'मेरी माटी मेरा देश' अंतर्गत कार्यक्रमातून तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांकडून पणत्या करून घेण्यात आल्या. याचे फोटो पुणे महानगरपालिकेने दिलेल्या वेबसाईटवर upload करण्यात आले होते. संस्थेला या उपक्रमाचे सर्टिफिकेक्ट मिळाले आहे.

- दरवर्षी प्रमाणे तिन्ही शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शिक्षक दिना निमित्त प्रिझम कडून सर्व शिक्षक व सेवकांना भेटवस्तू देण्यात आली.
- प्रिझम फौंडेशन मध्ये गणेश स्थापना करण्यात आली. यावर्षी 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी' या विषयावर गणपती सभोवती व हॉल सजावट करण्यात आली होती. गणेशोत्सवा निमित्त लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.
- प्रिझम कडून सर्व स्टाफला व विद्यार्थ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देवून पावभाजी व गुलाबजाम ची पार्टी देण्यात आली.
- दि. ०३.०२.२०२४ रोजी संस्थेत 'पुणे परिसर' याविषयावर तिन्ही शाळेचे एकत्रित प्रदर्शन भरविण्यात आले होते. तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, संशोधन, संरक्षण, मनोरंजन, खाद्य संस्कृती इ. विषयांवर चार्ट, प्रोजेक्ट, मॉडेल बनविले. विविध खेळ खेळण्यास होते. संस्थेचा व काही पालक, बाहेरील व्यक्तींनी वस्तू विक्री स्टॉल लावले होते. विश्वस्त, हितचिंतक, देणगीदार व पालकांनी प्रदर्शन पाहून सर्वांचे कौतुक केले. तसेच वृत्तपत्रामध्ये प्रदर्शनाची बातमी व फोटो छापून आले आहे.
- वर्षभर तिन्ही शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करून त्यानिमित्याने स्पर्धा घेण्यात आल्या.
- दिवाळी ग्रिटिंग व नूतन वर्षाचे ग्रिटिंग तयार करून ट्रस्टी, हितचिंतक, देणगीदार, पालक, प्रिझम स्टाफ यासर्वांना ई-मेल व WhatsApp message व्दारे शुभेच्छा पाठविण्यात आल्या आहे.

अभ्यास विषयक

- अभ्यासक्रमाच्या दृष्टीने प्रत्येक शाळेला उद्दिष्टे आणि अभ्यासक्रमाचा नमुना देण्यात आला. शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा असे सांगण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार त्यांच्या पाठयक्रमात बदल करावा व सुधारणा करावी असे सांगण्यात आले. ठराविक विषयांच्या व्यतिरिक्त कार्यविषय शिक्षण अभ्यासक्रमात समावेश करावा.

मिटिंग / सभा

**विश्वस्त**

- ट्रस्टी बरोबर वेळोवेळी WhatsApp call, message Team meeting व्दारे कामकाजा संदर्भात, नविन विश्वस्त नेमण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला. श्री. शशिकांत पटवर्धन यांची नियुक्ती करण्यात आली.
- डॉ. प्रसाद गोडबोले यांच्याबरोबर WhatsApp call व्दारे संस्थेच्या कामकाजा संदर्भात
- रंजनाताई पटवर्धन यांच्याबरोबर संस्थेच्या कामकाजा संदर्भात
- रंजना पटवर्धन व श्री. किशोर सरपोतदार यांच्याबरोबर संस्थेच्या कामकाजा संदर्भात
- डिसेंबर - श्री. रोहित ओगले यांनी संस्थेला भेट देवून कामकाजा संदर्भात
- जानेवारी - ट्रस्ट मिटिंग झाली. ४ ट्रस्टी ऑनलाईन तर २ ट्रस्टी संस्थेत उपस्थित होते.
- श्री. शशिकांत पटवर्धन महिन्याच्या दर बुधवारी संस्थेत येवून कामकाजाचा आढावा घेवून मार्गदर्शन करणार आहेत.

वर्षभरात संचालिका हर्षा मुळे यांनी ॲडमिन, अकांउट, तिन्ही शाळांच्या मुख्याध्यापिका, शिक्षिका व इतर कामांसंदर्भात बाहेरील व्यक्तींशी पुढील मिटिंग घेतल्या :

**ॲडमिन व अकांउट स्टाफ :** कामकाजाचे नियोजन, व्यवस्थापनामधील मुद्दे, ISO Audit, Website, Facebook, YouTube, बॅंकेच्या कामकाज, Financial Audit व इतर संबंधित कामकाजा संदर्भात

**कार्यक्रम :** पालखी, कै. पद्मजा गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर समिती, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, तमोहर समिती या कार्यक्रमा संबंधित शिक्षकांबरोबर नियोजन संदर्भात

**तिन्ही शाळांच्या मुख्याध्यापिका :** वर्षभरातील सांस्कृतिक कार्यक्रम, अभ्यासक्रम, बाहेरील स्पर्धा, ISO Audit, विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप, दिवाळी पार्टी, सुट्टी, पालक फिडबॅक, २६ जानेवारी, ई-लर्निंगचा वापर, शैक्षणिक सहल, सहल, पालक सभा, विद्यार्थ्यांनी उर्वरित फी, फी sponsorship, गॅदरिंग, तिन्ही शाळांचे एकत्रित प्रदर्शन नियोजन व आयोजन, ज्ञानप्रबोधिनी GTBT प्रोजेक्ट, इन-हाउस ट्रेनिंग शिक्षक अभ्यासक्रम, वेन्यू कोर्स, बाहेरील कार्यशाळा, बाहेरील शाळा व कॉलेजला भेट देणे, इंटर्नशिपला आलेले विद्यार्थी, बाहेरील प्रदर्शन, विद्यार्थी परिपत्रक, १८ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांबरोबर बोलणे, ऑटिस्टिक विद्यार्थी प्रवेश, आनंदमेळा,
पुढील वर्षीची वार्षिक फी, नविन ॲडमिशन व फी, कॅलेंडर व नियोजन, अभ्यासक्रम, कामाची विभागणी, शिक्षक संख्या, युनिफॉर्म, वेन्यू अभ्यासक्रम व नियोजन

**प्रिझम शिक्षक स्टाफ** : ई लर्निंगचा वापर करावा, अभ्यासाचे नियोजन, शैक्षणिक सहली, IEP बाबत बारकाईने काम करावे, स्नेहसंमेलनाबाबत सूचना, ॲक्टिव्हिटी, कामाचे नियोजन, सकारात्मकता

सर्व प्रिझम स्टाफ बरोबर वैयक्तिक बोलणे करून कामाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**फिनिक्स** : मुख्याध्यापिका व पर्यवेक्षिका यांच्याबरोबर शैक्षणिक साधने, SSC व NIOS बोर्ड संदर्भात

**एम.ओ.व्ही.एस** : उत्पादन, बाहेरील स्टॉल, वस्तू विक्री व सादरीकरण, प्रदर्शन सहभागात संस्थेची माहिती इ.

**रिक्षा व व्हॅन** : दरवाढी संदर्भात, रिक्षा व व्हॅन काकांची माहिती, विद्यार्थ्यांची यादी इ.

**पालक सभा** : तिन्ही शाळांच्या पालक सभेत नवीन पालकांना प्रिझम फौंडेशनची माहिती देण्यात आली. फी संदर्भात, देणगीबाबत आवाहन करण्यात आले आहे. फिनिक्स शाळेतील पालकांबरोबर एस.एस.सी बोर्ड माहिती देण्यासंदर्भात, वेळोवेळी घेतल्या गेलेल्या पालकसभेतही पालकांशी संवाद साधण्यात आला.

**देणगी** : श्रीराम ओक, जान्हवी ओक व वैभव राजणगावकर यांच्याबरोबर सॅलरी सपोर्ट फंड संदर्भात, महेंद्र जाधव, सचिन नगरकर, डॉ. दामले, Infocept Harshal Bhoyar, Income-tax office – Mr. Sandesh Jadhav

माधुरी गोखले - रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर व शितल पटवर्धन - रोटरी क्लब ऑफ पुना मिडटाउन यांच्याबरोबर डोनेशन CSR प्रोजेक्ट संदर्भात

**संस्थेची माहिती / जागरूकता** : पुष्कर गोखले, माधुरी सहस्त्रबुध्दे, नंदिनी भुवड, सीमा भोळे, किर्ती जाधव, श्री. वंझारवाडकर, श्री. राजेंद्र रूणवाल - बिजापूर, सायरस बागवाडिया, अनिता भागवत, सोनदरा गुरूकुल -बीड येथील कार्यकर्ते, सौ. गाडगीळ, स्वाती जोग - मुंबई, अंजली शिदीकर, राधिका घोरपडे, डॉ. कुणाल ढोबळे

**शैक्षणिक साहित्य** : गायत्री रांजणगावकर, ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या अश्विनी देशपांडे

**कार्यशाळा** : ज्ञानप्रबोधिनी - केतकी कुलकर्णी व शांभागी यांच्याबरोबर GTBT प्रोजेक्ट,

सुंदरा गुरूकुलम् डोमरी, बीड येथील सुवर्णा पवार यांच्याबरोबर शिक्षक प्रशिक्षण देण्याबाबत, डॉ. बडवडे - इचलकरंजी यांच्याबरोबर विशेष शिक्षण जागृती बाबत, रोहीणी फाळके यांच्याबरोबर शिक्षक कार्यशाळा

**प्रदर्शन** : मुकुंद दुधाळे, मनिषा देशमुख, डॉ. सुवर्णा देवधर, स्नेहल कुलकर्णी व अलका वाडकर, यशस्वी फौंडेशचे योगेश शेंडे, अमिता नेने

**हॉल भाडेतत्व** : वैजयंती वावळ, बळीराम पवार

**मेटेन्स** : शैलेश बुरसे यांच्याबरोबर फॅब्रिकेशन कामासंदर्भात, श्री. धोत्रे ड्रेनेज लाईन संदर्भात, श्री. जोशी व श्री. भिडे बांधकामा संदर्भात, श्री. संतोष परदेशी

**संस्थेची माहिती पोहचविण्याच्या दृष्टीने** : श्री. शशिकांत पटवर्धन, श्री. जगताप, सौरभ सावंत, शर्मिली गोयल, कोमल लिमये अभिजीत कोल्हटकर व शिल्पा गोडबोले व टीम, Cast Bay – आमिर खान - मुंबई अतुल सिंग यांच्याबरोबर डाउन्स सिंड्रोम विद्यार्थ्यांवर फिल्म बनविण्यासंदर्भात, विरेंद्र देवस्थळी - Poadcast मध्ये मुलाखत संदर्भात

**इतर** : पूर्वा साळवेकर बरोबर व्यवसाय प्रशिक्षण संदर्भात, चेतन शिंगवी - विद्यार्थी युनिफॉर्म, पालक - श्री व सौ. वकील, श्री. व सौ. बोराळकर, सेफोश संस्था - वैदही कुलकर्णी

**कायदेविषयक** - ॲड. एरंडे यांच्याबरोबर ट्रस्टी change report संदर्भात, ॲड.धामणकर यांच्याबरोबर ILS केस संदर्भात

**इंटरर्नशिप / मार्गदर्शन** - डॉ. अल्पना वैद्य यांच्या बरोबर Symbiosis College visit व student's internship, एस.एन.डी.टी कॉलेज- पी.एच.डी ची विद्यार्थीनी प्राची तांबे

वैद्यकीय तपासणी

- सप्टेंबर मध्ये तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप डॉ. मोघे व डॉ. प्रभुणे यांच्या कडून करण्यात आले.

ISO 9001 : 2015

- हर्षा मुळे यांनी ऑगस्ट २०२३ व फेब्रुवारी २०२४ मध्ये ISO चे Internal Audit घेतले.
- Triennial / Recertification Audit - Lead Auditor श्री.प्रविण चौधरी यांनी डिसेंबर २०२३ मध्ये ISO Audit घेतले.
- ISO Certificate पुढील तीन वर्षा साठी मिळाले.

वेबसाईट / YouTube / Facebook

- वर्षभरात Web-site व Facebook वर संस्थेतील कार्यक्रमाचे फोटो, बातमी पाठविण्यात आली. तसेच काही कार्यक्रमाची YouTube link तयार करून पाठविण्यात आल्या.

जागरूकता

- नवक्षितीज आयोजित street play साठी संचालिका हर्षा मुळे यांना प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी संस्थेची माहिती दिली.
- नंदिनी भुवड दिग्दर्शित 'दिड दमडीचे तेल' या शॉर्ट फिल्मचे उद्घाटन लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेतील विद्यार्थ्यांच्या नृत्याने करण्यात आले. यावेळी संचालिका हर्षा मुळे यांनी संस्थेची माहिती दिली. या उद्घटनाची YouTube link नंदिनी भुवड यांनी upload केली आहे. यासाठी नंदिनी भुवड यांनी विद्यार्थ्यांना नाटय प्रशिक्षण दिले होते.
- प्रोत्साहन, उमंग व चैत्रांगण या दोन प्रदर्शात संस्थेने सहभाग घेतला होता. प्रदर्शनाला भेट देणा-या व्यक्तींना संस्थेचे माहितीपत्रक देवून संस्थेच्या कामकाजाबाबत सांगण्यात आले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या.
- डिसेंबर मध्ये लायन्स क्लब ऑफ इंटर्नॅशनल तर्फे 'शिक्षक मेळावा' याचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेतील ६ शिक्षकांनी मेळाव्यात सहभाग घेवून संस्थेची माहिती सांगितली. तिन्ही शाळेला भेटवस्तू स्वरूपात सतरंज्या दिल्या.
- श्री. दुधाळे - पुणे महानगरपालिका आयोजित बालोत्सव हा दिव्यांग मुलांसाठी साजरा करण्यात आला. या बालोत्सवात संस्थेचे तमोहर अंक व माहिती पत्रक लोकांना देण्यात आले. तसेच संचालिका व मुख्याध्यापिका बालोत्सव उद्घाटनात सहभागी झाल्या होत्या.
- प्रिझम फौंडेशन आयोजित प्रदर्शनाचे बॅनर, परिपत्रक संस्थेच्या आजूबाजूच्या परिसरात देण्यात आले होते. तसेच ई-मेल व WhatsApp व Facebook वर सुध्दा देण्यात आले होते. प्रदर्शनाची बातमी व फोटो वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले आहे.
- अनुग्रह फौंडेशन आयोजित 'दिव्यांग जनजागृती फेरी' संभाजी उद्यान येथे तिन्ही शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. येथे विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. विद्यार्थ्यांना हा वेगळा अनुभव मिळाला.
- दि. ०८ मार्च जागतिक महिला दिना निमित्त केतकी काळे आयोजित विशेष विद्यार्थीनीचा कौतुक सोहळा या कार्यक्रमास संचालिका हर्षा मुळे, लार्क व वेन्यू मुख्याध्यापिका उपस्थित होत्या.
- बॅंक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड च्या देणगी वितरण समारंभास संचालिका हर्षा मुळे उपस्थित होत्या.
- विदिशा विचार मंच आयोजित कविश्रेष्ठ कुसुमाग्रज स्मृती सन्मान प्रदान सोहळा या कार्यक्रमात विश्वस्त श्री. किशोर सरपोतदार व संचालिका हर्षा मुळे यांनी संस्थेची माहिती सांगितली.

बाहेरील भेट

- एस.एन.डी.टी - बी.एड कॉलेजच्या ५० विद्यार्थिनीनी, ज्ञानप्रबोधिनी - संवादिनी ग्रुपच्या १५ सदस्यांनी, सिंम्बोयिस कॉलेज मधील मानसशास्त्र विभागातील ९० विद्यार्थीनी, HDFC School junior college , सौ. विमलाबाई गरवारे प्रशालेच्या १२ विद्यार्थीनी या सर्वांनी संस्थेला भेट देवून माहिती घेतली.
- BMC Company ने संस्थेतील १० सदस्यांनी संस्थेला भेट दिली.
- राधिका घोरपडे यांनी संस्थेला भेट देवून सद्गुरू सेवा प्रतिष्ठान अंतर्गत कार्यक्रमातून संस्थेला सॅनिटरी नॅपकिन देणगी स्वरूपात दिले.

भेट

हर्षा मुळे व विद्या भागवत यांनी खालील ठिकाणी भेट देवून माहिती घेतली :

Sapling School मध्ये शैक्षणिक साधने

फिनिक्स व लार्क शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांनी भेट देवून गणित व भाषा विषयक शैक्षणिक साधनांची माहिती घेतली.

- अब नार्मल होम
- दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल मधील स्मॉल स्टेप्स् सेंटर
- डॉ. सुनील गोडबोले व विप्रदा गद्रे यांच्यावरोबर 'ऑटिझम' या विषयावर चर्चा करण्यात आली.
- मुख्याध्यापिका व काही शिक्षकांनी ऑटिझम विषय समजवून घेण्यासाठी प्रसन्न ऑटिझम सेंटरला भेट दिली.

प्रोजेक्ट

- रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर व रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाउन, Infocept Company, Bank Of Maharashtra Retired Employees Welfare Organisation, Druva IT Solutions
  वरील सर्वांना देणगी संदर्भात आवाहन पत्र पाठविण्यात आले होते.
- CSR व NGO संदर्भातील मिटिंगमध्ये संचालिका सहभागी झाल्या होत्या.

बाहेरील कार्यशाळा

- ज्ञानप्रबोधिनी MCCIA आयोजित केलेला 'लैगिंक शिक्षण आणि गैरवर्तन' याविषयावरील परिचर्चेत हर्षा मुळे व विद्या भागवत सहभागी झाल्या होत्या.
- बालकल्याण व निकलास फौंडेशन नागपुर आयोजित 'शैक्षणिक साधनांचे प्रदर्शन व शिक्षकांसाठी प्रशिक्षण', नवक्षितिज आयोजित 'नाटक कसे बसवावे' KEM आयोजित 'मुलांच्या वर्तवणुक समस्या' इ. कार्यशाळेत तिन्ही शाळेतील निवडक शिक्षकांनी सहभाग घेतला. बालकल्याण संस्थेने 'फुले उमलताना' या विषयावर विद्यार्थीनीसाठी आयोजित केलेल्या कार्य शाळेत काही निवडक विद्यार्थीनींना नेण्यात आले होते. शिक्षिका व सेविकेनी पण सहभाग घेतला होता.
- वेन्यू ट्रेनिंग इन्स्टिटयूट तर्फे इन-हाउस ट्रेनिंग मधील शिक्षकांसाठी घेण्यात येत असलेल्या कार्यशाळेत व पालक कार्यशाळेत संचालिका हर्षा मुळे सहभाग घेतला होता.

कार्यशाळा

- दि.१०.१०.२०२३ रोजी हर्षा मुळे यांनी 'अध्ययन अक्षमता' या विषयावर आनंद विद्यालय शिरवळ येथील पालकांसाठी कार्यशाळा घेतली.
- दि. २०.०१.२०२४ रोजी ज्ञानसंवर्धिनी शाळेत शिक्षकांसाठी 'अध्ययन अक्षमता' या विषयावर हर्षा मुळे यांनी कार्य शाळा घेतली. कार्यशाळेत सावित्रीबाई फुले प्रशाला व ज्ञानसंवर्धिनी मराठी व इंग्लिश माध्यम मधील शिक्षक सहभागी होते.

इंटर्नशिप

- कर्वे इन्स्ट्रिटयूट मधून MSW करणारे दोन विद्यार्थीनी तिन्ही शाळेत इंटर्नशिप साठी सोमवार, मंगळवार व बुधवार येत होत्या.
- फिनिक्स, लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेत फर्ग्युसन, एस.एन.डी.टी - बी.एड व सायकॉलॉजी डिपार्टमेंट, सिम्बोयसिस कॉलेज, मूळगावकर कॉलज, गरवारे कॉलेजच्या सायकॉलॅजी व फिजिओथेरपी डिपार्टमेंट, अडवाणी कॉलेज, मॉर्डन आर्टस् कॉलेज व फिजिओथेरपी डिपार्टमेंट इ. मधून विद्यार्थीनी निरीक्षणासाठी येत होत्या.
- फिनिक्स शाळेत फेब्रुवारी - Victorious Kids Educare School मधील ३ विद्यार्थीनी reusing and recycling waste material या विषयावर activity घेण्यासाठी आल्या होत्या.

दुरूस्ती

- यावर्षी वर्ग खोली क्र. १३ व १४ - उंची वाढविणे, खिडक्या व पत्रे बदलणे, रंगकाम, इलेक्टिसिटीचे काम, फळे त्यासाठी लागणारा सर्व निधी व कामाची देखरेख श्री. प्रकाश पटवर्धन यांनी केली.
- वर्षभरात इलेक्ट्रिकसिटी, कॉम्प्युटर व प्रिन्टर, सुतार काम, प्लबिंग, बांधकाम, रंगकाम, फेब्रिकेशन, EPBX, CCTV मशिन यावर आवश्यकतेनुसार कामे करून घेण्यात आली.

आनंद विद्यालय शिरवळ

- मानातज्ज्ञ क्षमा उपासनी यांनी ११ नविन विद्यार्थ्यांचे टेस्टिंग केले.
- तीन नविन ॲडमिशन झाल्या आहेत.
- वर्षभरात सर्व सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करून स्पर्धा घेण्यात आल्या.
- इ. १० वी ची परिक्षा दिलेले ४ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत.
- विद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त असलेल्या कार्यक्रमास संचालिका हर्षा मुळे या उपस्थित होत्या.

- हर्षा मुळे यांनी आनंद विद्यालयाच्या वार्षिक बक्षिस वितरण समारंभास उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले .
- वर्षभर हर्षा मुळे व नेहा परांजपे यांनी आनंद विद्यालयाला भेटून देवून कामकाजाचा आढावा घेवून मार्गदर्शन केले .

इतर

- तिन्ही शाळेतील विद्यार्थी बालकल्याण संस्थेत महिन्याच्या पहिल्या, तिस-या व पाचव्या मंगळवारी ॲक्टिव्हिटी साठी जात होते .
- दिवाळी सुट्टीत प्रिझमच्या संपूर्ण परिसर, सर्व ऑफिस व वर्ग खोल्या मधे पेस्ट कंट्रोल करण्यात आले .
- श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट तर्फे श्री . निलेश घोडके यांनी 'राम कलश अक्षता' संस्थेत आणला होता . संस्थेत या कलशाचे आरती व पूजन करण्यात आले होते . दि . २२ .०१ .२०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने 'अयोध्या - राम मंदिर सोहळा' निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली असल्याकारणाने प्रिझम मधील तिन्ही शाळेतील विद्यार्थी व स्टाफला सुट्टी देण्यात आली होती .

अकांउट

- सर्व प्रिझम स्टाफला दिवाळी बोनस देण्यात आला .
- सर्व प्रिझम स्टाफला सॅलरी सपोर्ट फंड (दोन महिनाचा पगार ) देण्यात आला .
- काही संस्थांनी व व्यक्तींनी वस्तू स्वरूपात संस्थेला देणग्या दिल्या आहेत .
- प्रिझम फौंडेशन कडून देणगीसाठी आवाहन पत्रही पाठविण्यात आली .

हर्षा मुळे
संचालिका
प्रिझम फौंडेशन